## व्हेकेशन होम्स नोंदणीसाठीचा अर्ज

| | तपशील | अर्जदाराने भरावयाची माहिती |
|---|---|---|
| **अ) अर्जदाराचा तपशील** | | |
| 1 | अर्जदाराचे नाव | |
| 2 | अर्जदाराचा दूरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक | |
| 3 | अर्जदाराचा ई-मेल आयडी | |
| 4 | व्यवसायाचे नाव | |
| 5 | व्यवसायाचा प्रकार<br>(व्यक्तिगत मालकी/ भागीदारी / प्रा. लि. / एलएलपी / सार्वजनिक लि. / सहकारी संस्था / ट्रस्ट / स्वयंमदत गट / संयुक्त वन व्यवस्थापन समिती / इतर) | |
| 6 | अर्जदाराचा पॅन क्रमांक | |
| 7 | व्यवसायाचा पॅन क्रमांक (लागू असल्यास) | |
| 8 | अर्जदाराचा आधार क्रमांक | |
| 9 | उद्योग आधार क्रमांक (लागू असल्यास) | |
| 10 | व्हेकेशन होम्सच्या मालकीचा पुरावा<br>(7/12 दस्तऐवज / मालमत्ता कर पावत्या / प्रॉपर्टी कार्ड / इतर): | |
| 11 | सदर मालमत्ता / व्हेकेशन होम भाडेतत्त्वावर ऑपरेटरकडे दिले आहे का? (होय / नाही) | |
| 12 | होय असल्यास, ऑपरेटरचे नाव नमूद करा | |
| 13 | ऑपरेटरसोबत केलेला भाडेकरार / व्यवस्थापन कराराची प्रत कृपया सादर करा | |
| **ब) मालमत्तेचा तपशील** | | |
| 1 | व्हेकेशन होमचे नाव | |
| 2 | व्हेकेशन होमचा संपूर्ण पत्ता | |
| 3 | पत्त्याचा पुरावा (वीज बिल / पाणी बिल / इतर) | |
| 4 | व्हेकेशन होमचे भौगोलिक स्थान / गुगल मॅप लिंक | |
| 5 | पर्यटकांसाठी सदर व्हेकेशन होमचा वापर सध्या होत आहे का? (होय/नाही) | |

| | | |
|---|---|---|
| 6 | सध्या वापर होत असल्यास, कोणत्या वर्षापासून?<br>मार्च 2025 पर्यंत किती पर्यटकांनी भेट दिली त्याचा तपशील | |
| 7 | व्हेकेशन होमचे एकूण क्षेत्रफळ (चौरस फूट) | |
| 8 | महाबुकिंगवर पोर्टल वरील नोंदणी क्रमांक | |
| **क) निवास सुविधांचे तपशील** | | |
| 1 | खोल्यांची संख्या | |
| 2 | प्रत्येक खोलीचे क्षेत्रफळ (चौरस फूट) | |
| 3 | प्रत्येक खोलीला संलग्न शौचालय आहे का? (होय / नाही)<br>(प्रत्येक खोलीचा तपशील सादर करा) | |
| 4 | प्रत्येक खोलीत कचरापेटीची सुविधा आहे का? (होय / नाही) | |
| 5 | व्हेकेशन होम पर्यंत पोहोच रस्ता आहे का? (होय / नाही) | |
| 6 | पाहुण्यांच्या विनंतीनुसार अन्न (नाश्ता / जेवण / रात्रीचे जेवण)<br>उपलब्ध करून दिले जाऊ शकते का? (होय / नाही) | |
| 7 | रोख किंवा UPI द्वारे पेमेंट घेण्याची सुविधा आहे का? (होय / नाही) | |
| **ड) इतर सुविधा** | | |
| 1 | स्वयंपाकघर (होय / नाही) | |
| 2 | जेवणासाठी हॉल (होय / नाही) | |
| 3 | बाग (होय / नाही) | |
| 4 | पार्किंग (होय / नाही) | |
| 5 | इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग स्टेशन / सुविधा (होय / नाही) | |
| 6 | मुलांच्या खेळण्यासाठी जागा (होय / नाही) | |
| 7 | स्विमिंग पूल (होय / नाही) | |
| 8 | वाय-फाय (होय / नाही) | |
| 9 | प्राथमिक उपचार पेटी (होय / नाही) | |
| 10 | अग्निसुरक्षा उपकरणे (होय / नाही) | |
| 11 | फिल्टर पाणी / आरओ (होय / नाही) | |
| 12 | पावसाचे पाणी साठवणूक / भूजल पुनर्भरण सुविधा ?(होय / नाही) | |
| 13 | सौरऊर्जाचा वापर केला जातो का? (होय / नाही) | |

| | | |
|---|---|---|
| 14 | बायोगॅस / इतर कोणत्याही अक्षय उर्जेचा वापर केला जातो का? (होय / नाही) | |
| **E) GRAS Chalan** (www.gras.mahakosh.gov.in) | | |
| | अर्ज शुल्क (₹ २५००/-) भरले आहे का? (होय / नाही) | |

**अर्जदाराची सही**

**संलग्नक: * चिन्हांकित कागदपत्रे अर्जासोबत सादर करणे अनिवार्य आहे.**

| अ.क्र. | दस्तऐवज |
|---|---|
| 1 | अर्जदाराचे आधार कार्ड* |
| 2 | अर्जदाराचे पॅन कार्ड* |
| 3 | व्यवसायाचा पॅन कार्ड (लागू असल्यास) |
| 4 | उद्योजक आधार प्रमाणपत्र (लागू असल्यास) |
| 5 | व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र (लागू असल्यास – CIN / दुकान अधिनियम परवाना / इतर) |
| 6 | व्हेकेशन होमच्या मालकीचा पुरावा* |
| 7 | व्हेकेशन होम व खोल्यांचे किमान 5 फोटो* |
| 8 | स्थानिक पोलिस स्टेशनकडून चारित्र्य प्रमाणपत्र* |
| 9 | शेजारील दोन रहिवाशांकडून ना हरकत प्रमाणपत्र* |
| 10 | बांधकाम परवानगी प्रमाणपत्राची प्रत* अथवा बांधकाम पूर्णता प्रमाणपत्राची प्रत* |
| 11 | GRAS चलनाची प्रत* |
| 12 | घोषणापत्र (स्वाक्षरीसह), अटी व शर्तीचे पत्र* |
| 13 | ऑपरेटरसोबत केलेला भाडेकरार / व्यवस्थापन कराराची प्रत (लागू असल्यास) |
| १४ | महाबुकींग पोर्टलवर नोंदणीची प्रत* |

# पर्यटक निवास प्रकार : व्याख्या

## १. व्हेकेशन होम (Vacation Home)

व्हेकेशन होम हे खाजगी निवासी मालमत्ता असते जी अल्पकालीन सुट्टीसाठी मालक किंवा भाडेकरू वापरतो. हे पूर्णपणे सुसज्ज असते आणि वैयक्तिक घरासारखे वाटते.

मुख्य वैशिष्ट्ये:

- संपूर्ण मालमत्ता भाड्याने दिली जाते

- एका युनिट साठी नोंदणी होते

- कुटुंबे किंवा गटांसाठी योग्य

- आकर्षण स्थळी किंवा निसर्गरम्य भागात किंवा कृषी पर्यटन

- स्वतंत्र उभारणी

- गोपनीयता आणि घरगुती वातावरण

## २. पर्यटक व्हिला (Tourist Villa)

पर्यटक व्हिला ही पर्यटकांसाठी खास डिझाइन केलेली आलिशान स्वतंत्र निवासस्थाने असतात. यात उच्च दर्जाच्या सुविधा आणि खाजगी वातावरण असते.

मुख्य वैशिष्ट्ये:

- स्वतंत्र आरामदायी निवास

- उच्च सुविधा (स्विमिंग पूल, बाग, शेफ सेवा)

- शांतता आणि आराम

## ३. होम स्टे (Home Stay)

होम स्टे ही अशी निवासव्यवस्था आहे जिथे पर्यटक स्थानिक कुटुंबाबरोबर राहतात, सामान्यतः त्यांच्या घरातील खासगी खोलीत. येथे सांस्कृतिक देवाणघेवाण आणि स्थानिक अनुभव, स्थानिक खाद्य, इ. यावर भर दिला जातो.

मुख्य वैशिष्ट्ये:

- घरमालक उपस्थित असतात

- सांस्कृतिक देवाणघेवाण प्रोत्साहन

- किफायतशीर

- स्थानिक स्वयंपाक/जेवण समाविष्ट असणे अपेक्षित

- स्थानिक वस्त्यांमध्ये स्थित

## ४. पर्यटक अपार्टमेंट (Tourist Apartment)

पर्यटक अपार्टमेंट ही स्वयंपूर्ण भाडेतत्वावर दिलेले घटक असतात (स्टुडिओ किंवा 1/2/3/4 बीएचके) ज्या मोठ्या निवासी किंवा व्यावसायिक इमारतींमध्ये असतात आणि अल्पकालीन काळासाठी भाडेतत्वावर दिल्या जातात.

मुख्य वैशिष्ट्ये:

- स्वतंत्र युनिट

- दीर्घ किंवा मध्यम कालावधीसाठी राहण्यायोग्य सर्व सुविधा

- ग्रामीण किंवा निमशहरी भागात

- खासगी व्यवस्थापन

- कुटुंबे व व्यावसायिक प्रवाशांसाठी उपयुक्त

- इमारतींमध्ये इतर सुविधा (स्विमिंग पूल, बॅडमिंटन, टेनिस, इ खेळ, हेल्थ क्लब, कम्यूनिटी हॉल)

## तुलनात्मक तक्ता

| प्रकार | मालमत्तेचा प्रकार | यजमान सहभाग | लक्षित गट | ठिकाण | प्रमुख वैशिष्ट्य |
|---|---|---|---|---|---|
| व्हेकेशनल होम | संपूर्ण घर | नाही | कुटुंबे, गट | पर्यटन / निसर्गरम्य स्थळे/जंगल, कृषी इ. | घरगुती अनुभव |
| पर्यटक व्हिला | लक्झरी स्वतंत्र घर | नाही | उच्चभ्रू पर्यटक | निसर्गरम्य स्थळे/ जंगल, कृषी इ. | गोपनीयता, लक्झरी सुविधा |
| होम स्टे | स्थानिक घरातील खोली | हो (मालक उपस्थित) | सांस्कृतिक/एकटे प्रवासी | निवासी वस्त्या/कृषी पर्यटन इ. | सांस्कृतिक अनुभव आणि आदरातिथ्य |
| पर्यटक अपार्टमेंट | अपार्टमेंट युनिट | सहसा नाही | कुटुंबे, व्यावसायिक प्रवासी | ग्रामीण/शहरी पर्यटक स्थळे/कृषी पर्यटन इ. | मूलभूत सुविधा असलेले स्वयंपूर्ण युनिट |

# अटी व शर्ती

## (होम स्टे / पर्यटन व्हिला / व्हेकेशन होम / पर्यटन अपार्टमेंट)

१. अर्जदाराला संबंधित विभागाच्या आवश्यक त्या परवानग्या व ना हरकत दाखला घेणे बंधनकारक राहील.

२. अर्जदाराला बांधकाम परवाना अथवा बांधकाम पूर्णत्वाचा दाखला सादर करणे बंधनकारक आहे.

३. अर्जदाराला पर्यटन संचालनालयातर्फे देण्यात आलेले प्रमाणपत्र दर्शनीय फलकावर लावणे बंधनकारक आहे.

४. अर्जदाराला प्रचार/प्रसिद्धी महाराष्ट्र पर्यटनच्या लोगोचा वापराची अनुमती असेल तथापि, याबाबत पुर्व सुचना विभागीय कार्यालयास द्यावी. यामध्ये IPR व वैयक्तीक वाद, टिका टिप्पणी, तक्रार होऊ नये याबाबत सर्व जबाबदारी मालकाची असेल.

५. सध्याच्या क्षमतेपेक्षा तीन पट अधिक पर्यटक एकत्र येणार असतील तर स्थानिक प्रशासनास आगावू कळविण्यात यावे.

६. अर्जदाराने सदर पर्यटक घटकाबाबत संबंधित सर्व प्राधिकारणांना कळविणे बंधनकारकआहे.

७. अर्जदाराला पर्यटन संचालनालयाच्या महा बुकिंग (https://mahabooking.com/) या पोर्टलवर पूर्व रजिस्ट्रशन करणे बंधनकारक राहील व त्याचा नोंदणी क्रमांक अर्जामध्ये नमुद करावी तसेच पोर्टलद्वारे बुकींग करण्यात यावी.

८. अर्जदाराने पर्यटकांची नोंदवही बुकींग पोर्टलवरुन जनरेट करावी किंवा सेव्ह करावी.

९. परदेशी पर्यटक वास्तव्यास आल्यास पर्यटकांकडून C-Form परिपूर्ण भरून घेणे आणि त्याची माहिती (https://indianfrro.gov.in/eservices) या संकेतस्थळावर ऑनलाईन भरणे अनिवार्य आहे संबंधित परदेशी पर्यटकांच्या पासपोर्टची छायांकित प्रत फॉर्म सोबत संग्रहित करून ठेवावी.

१०. पर्यटकांना देण्यात येणारा कक्ष, टॉयलेट, बाथरूम, आणि परिसर स्वच्छ असावा.

११. पर्यटक घटकांच्या ठिकाणी कोणताही अनुचित प्रकार घडल्यास किंवा आढळल्यास नोंदणी प्रमाणपत्र रद्द करण्यात येईल. पर्यटकांकडून कोणत्याही प्रकारची तक्रार प्राप्त झाल्यास छाननी अंती नोंदणी प्रमाणपत्र रद्द करण्यात येईल. तसेच तपासणी पथकास आपण दिलेली माहिती खोटी आढळल्यास नोंदणी प्रमाणपत्र रद्द करुन मालकावर गुन्हा दाखल करणेत येईल.

१२. सदर ठिकाणी जलतरण तलावाला लागणाऱ्या आवश्यक परवानग्या घेतलेल्या असाव्यात. तथापि, आपल्या पर्यटन घटकाच्या ठिकाणी जलतरणामुळे काही दुर्घटना घडल्यास अथवा पर्यटकांच्या जिवीतास धोका निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदाराची/मालकाची राहील.

१३. नोंदणी प्रमाणपत्रावर नमूद केलेल्या कक्षांपेक्षा अतिरिक्त कक्ष आढळून आल्यास त्याबाबत घेतलेल्या परवानग्या सादर कराव्यात.

१४.केंद्र शासनाच्या पर्यटन विभागाच्या ( https://nidhi.tourism.gov.in/ )या संकेत स्थळावर Accommodation-home stay/ tourism villa/ vacation Home/ Tourist Apartment म्हणून नोंदणी केल्या नंतर पर्यटन विभागाकडून Data Verified केल्या नंतर आपणास user Id आणि Password मिळाल्यानंतर Pledge certificate download करून सदर Pledge certificate दर्शनी भागात लावावे.

१५. महाबुकींग पोर्टलवर नोंदणी केल्यानंतर मिळणारे सर्टीफिकेट ही अनुमती पत्र दर्शनी भागात लावावे तसेच पोर्टलद्वारे बुकींग घेण्यात याव्यात.

१६. घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन करणे आवश्यक आहे.

१७.आपल्या केंद्राबद्दल कोणतीही तक्रार प्राप्त झाल्यास चौकशीअंती दोषी आढळल्यास नोंदणी रद्द करण्याचा पूर्ण अधिकार पर्यटन कार्यालय संबंधित उपसंचालक यांचा असेल.

१८. अर्जदाराने स्थानिक पोलिसांकडून चारित्र्याचा दाखला सादर करणे बंधनकारक आहे.

१९. पर्यटन अपार्टमेंट च्या बाबतीत संबंधित सोसायटी चे ना-हरकत प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

२०.होम स्टे व व्हेकेशन होम च्या बाबतीत शेजारील व्यक्तींना पर्यटकांमुळे किंवा इतर कार्यक्रमांमुळे त्रास होणार नाही. याची जबाबदारी मालक/अर्जदार यांचेवर असेल.

२१. प्लास्टिक बॅग, प्लास्टिक बॉटल अशा प्लास्टिक संबंधी इतर तत्सम वस्तू इ. चा वापर प्रतिबंधीत असेल.

वरील अटी व शर्ती मी वाचल्या असुन वरील सर्व अटी व शर्तींचे पालन करण्याची मी जबाबदारी घेत आहे.

अर्जदाराचे नाव:

दिनांक: अर्जदाराची सही

ठिकाण:

# पर्यटन घटक मालक/ऑपरेटर यांच्या भूमिका आणि जबाबदाऱ्या

१. वास्तव्यास असणाऱ्या पर्यटकांची सुरक्षितता व पोषक वातावरणाची जबाबदारी मालक/ऑपरेटर यांची असेल. याकरीता आवश्यक त्या सर्व सुरक्षा उपाययोजनांची जसे की अग्निसुरक्षा उपकरणे, सीसीटीव्ही निगराणी व्यवस्था, व सुरक्षित लॉकर प्रणाली, इ. अंमलबजावणी व देखभाल करतील.

२. पर्यटकांसाठी उपलब्ध असलेल्या सर्व खोल्या, शौचालये, स्वयंपाकघर आणि सामायिक जागा येथे उच्च दर्जाची स्वच्छता व आरोग्य राखण्याची जबाबदारी मालक व ऑपरेटर यांची असेल. यासाठी आरोग्य व सुरक्षा नियमांनुसार नियमित स्वच्छता व कीटकनाशक फवारणी इ.केली जावी.

३. पर्यटकांसाठी असलेल्या सर्व खोल्यांमध्ये व त्यालगतची जागा हवेशीर असावी. जेणेकरून पर्यटकांना स्वच्छ हवा व आराम मिळेल याची जबाबदारी मालक व ऑपरेटर यांची असेल.

४. पर्यटन घटकांच्या ठिकाणी सुसज्ज आणि सहज उपलब्ध होणारा प्रथमोपचार संच (First Aid Box) ठेवण्यात यावा. प्रथमोपचार संचामधील उपचार योग्य साहित्यांची वेळोवेळी बदलणे आवश्यक आहे.

५. स्थानिक पोलीस, रुग्णवाहिका सेवा, अग्निशमन केंद्रे व जवळची वैद्यकीय केंद्रे यांचे आपत्कालीन संपर्क आणि तपशील पर्यटन घटक येथे पर्यटकांना सहज दिसतील अशा ठिकाणी स्पष्टपणे लावलेले असावे.

६. मालक/ ऑपरेटर हे सर्व पर्यटकांची डिजिटल स्वरूपात अचूक नोंदी ठेवतील. पर्यटकांची ओळख तपशीलासह नोंद शासनाच्या संबंधित नियमांनुसार ठेवली जाईल. या नोंदणीसाठी www.mahabooking.com या संकेतस्थळावरील इन्व्हेंटरी मॅनेजमेंट सिस्टिम चा वापर मालक/ऑपरेटर हे करतील.

७. पर्यटन घटकासाठी लागू असलेले पर्यटन व आदरातिथ्य सेवा यासंदर्भातील राज्य शासन व केंद्र शासनाचे नियम तसेच सक्षम प्राधिकरणांकडून वेळोवेळी जाहीर व अद्ययावत करण्यात येणारे कायदे, नियम व मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे मालक/ऑपरेटर यांना बंधनकारक आहे.

८. पर्यटन घटकसाठी पर्यावरणीय शाश्वततेच्या तत्त्वांनुसार पर्यावरणपूरक उपाययोजना जसे की कचरा व्यवस्थापन, पाण्याचे संवर्धन आणि नुतनीकरण/सौर ऊर्जा सुविधा, प्लॅस्टिकचा (कोणत्याही स्वरुपातील) वापर प्रतिबंधित करणे इ. जबाबदाऱ्या स्वीकाराव्यात व अंमलात आणाव्यात.

९. पर्यटन घटकासाठी वैध ग्रीन लीफ रेटिंग नोंदणी प्राप्त करणे व ती कायम राखणे आवश्यक आहे.

१०. मालक/ऑपरेटर यांना पर्यटन घटकाची www.mahabooking.com या पोर्टल वर नोंदणी करणे आणि ऑनलाईन पर्यटन नोंदणी व बुकिंग सुलभतेसाठी आवश्यक असलेल्या सर्व अटी व शर्तींचे पालन करणे बंधनकारक आहे.

११. पर्यटन घटकात/परिसरात ध्वनी प्रदुषण नियमांचे पालन करावे जेणेकरुन आजूबाजूच्या परिसरातील जनतेस त्याचा त्रास होणार नाही.

१२. अर्जासोबत दिलेली माहिती खोटी, दिशाभूल करणारी आढळल्यास नोंदणी प्रमाणपत्र रद्द होईल याची मला जाणीव आहे. यास्तव खोटी अथवा दिशाभूल करणारी माहिती मी देणार नाही.

दिनांक:

ठिकाण: नाव व सही: १..................................(मालक)

२................................. (ऑपरेटर) (लागू असल्यास)

# घोषणापत्र

मी, --------------------------, ---------------------- यांचा/यांची (मुलगा / मुलगी / पती / पत्नी), स्थायिक -------------------------- (इमारत / घराचे नाव, संपूर्ण पत्ता), या ठिकाणी मालक / संचालक / भाडेकरू या नात्याने खालील ठिकाणी असलेल्या मालमत्तेचा -------------------------- मालक / प्रशासक / धारक म्हणून खालीलप्रमाणे घोषणापत्र देतो / देते:

१. वरील नमूद मालमत्तेबाबत कोणताही कायदेशीर वाद, खटला, तारण अथवा मालकीच्या बाबतीत कोणताही वाद प्रलंबित नाही.

२. सदर मालमत्ता बेकायदेशीर किंवा कोणत्याही लागू असलेल्या बांधकाम नियमावली, क्षेत्र नियोजन कायदे अथवा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या नियमांच्या विरोधात बांधलेली नाही.

३. सदर मालमत्तेचे बांधकाम पूर्ण झालेले असून ती वास्तव्यास योग्य आहे.

४. सदर मालमत्ता संरचनात्मकदृष्ट्या मजबूत असून अग्निसुरक्षा, विद्युत सुरक्षा यासह सर्व आवश्यक सुरक्षा निकष पूर्ण करत आहे.

५. सदर मालमत्तेमध्ये कोणत्याही बेकायदेशीर, अनैतिक अथवा गैरकायदेशीर क्रियाकलापांना परवानगी देण्यात आलेली नाही व अशा गोष्टी केल्या जात नाहीत.

६. नोंदणी अर्जात नमूद करण्यात आलेल्या सर्व सुविधा व सोयी, जसे की वीज, पाणीपुरवठा, स्वच्छता, सुरक्षा इत्यादी सुविधा उपलब्ध व कार्यरत असून त्या संबंधित मानकांनुसार आहेत.

७. मी होम स्टे / पर्यटन व्हिला / व्हेकेशन होम / पर्यटन अपार्टमेंट व इतर पर्यटन संबंधित उपक्रम यासाठी लागू असलेल्या सर्व कायदे, नियम व नियमावलीचे पूर्ण पालन करीन.

८. सदर मालमत्ता www.mahabooking.com या संकेतस्थळावर नोंदवली जाईल याची मी हमी देतो / देते व महाराष्ट्र पर्यटन बुकिंग इंजिन, अधिकृत सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्स, संकेतस्थळ, चॅटबॉट व इतर अधिकृत प्रचार माध्यमांद्वारे तिची प्रसिद्धी करण्यास संमती देतो / देते.

९. वरील माहितीमध्ये कोणतीही चुकीची माहिती, खोटी घोषणा अथवा नियमांचे पालन न केल्यास माझ्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, ज्यामध्ये नोंदणी रद्द करणे, आर्थिक दंड व इतर शिस्तभंगात्मक कारवाई यांचा समावेश असू शकतो.

१०. मालमत्तेच्या संरचनेत कोणताही मोठा बदल, मालकीमध्ये बदल अथवा कार्यपध्दतीमध्ये बदल झाल्यास मी माझेद्वारे संबंधित प्राधिकरणास वेळेत कळविण्यात येईल.

११. महाराष्ट्र पर्यटन संचालनालयच्या अधिकाऱ्यांना पर्यटन घटकांची परिक्षण पूर्ण अधिकार राहील. नियमांचे कोणतेही उल्लंघन आढळल्यास सदर पर्यटन घटकाची नोंदणी रद्द करण्याचा अधिकार पर्यटन संचालनालयास असेल.

१२. जर सदर मालमत्ता नोंदणीच्या तारखेपासून पुढे सलग एका वर्षाहून अधिक काळ कार्यरत नसेल, तर नोंदणी आपोआप रद्द झाले असे समजण्यात येईल, याची मला जाणीव आहे.

मी वरील घोषणेत नमूद केलेली सर्व माहिती खरी व अचूक असल्याची खात्रीपूर्वक पुष्टी करतो / करते. चुकीची माहिती दिल्यास, वस्तुस्थिती लपविल्यास अथवा वरील अटींचे पालन न केल्यास नियमांनुसार माझ्यावर कायदेशीर कारवाई करण्याबाबत माझी हरकत नाही.

सही:

अर्जदाराचे नाव:

ठिकाण:

दिनांक: